जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०७/०४/२०२४

## दि.०६/०४/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २०४/२०२४,भादविक ४५७,३८० |
| **फिर्यादी** | सिंतांशु साळेकर,वय २२ वर्षे,रा.पर्वती पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०५/०४/२०२४ रोजी रात्रौ २१/१५ वा ते दिनांक ०६/०४/२०२४ रोजी सकाळी ६/४२ वा.चे दरम्यान शॉप नं.२ नारायण नवले शाळेसमोर,न-हे रोड,धायरी पुणे येथील पाटील मोबाईल एक्सेसरीज ॲन्ड होलसेल या मोबाईल शॉप मधुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पाटील मोबाईल एक्सेसरीज ॲन्ड होलसेल हे मोबाईल शॉप शटर लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने दुकानाचे शटर उचकटुन दुकानात प्रवेश करुन दुकानातील सॅमसंग,रियलमी,व्हिओ,इनफिनिक्स,आयपॅड,विव्हो व्ही.१७ प्रो, कंपनीचे मोबाईल व स्मॉर्ट वॉच,पेनड्राइव्ह,तसेच कॅश काऊंटर मधील रोख ९,०००/-रुपये असा एकुण २,६८,७४२/-रु.किंमतीचा माल घरफोडी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अक्षय पाटील मो.नं.९९२२२१०११० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे ७२/२०२४,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | अक्षयकुमार गोरड, पोलीस उपनिरीक्षक,समर्थ पोलीस स्टेशन पुणे |
| **आरोपीत** | क्रेन चालक, त्याचा सहकारी,क्रेन मालक, ठेकेदार व कॉन्ट्रॅक्टर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०३/०४/२०२४ रोजी सकाळी ११/३० वा.चे सुमारास डोके तालीम चौक,नानापेठ पुणे येथे |
| **तपशिल** | समर्थ पो.स्टे.अ.मयत रजि.नं.३९/२०२४,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशी अंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील फिर्यादी यांची फिर्याद की,वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी जांभळे क्रेन्स सर्व्हिस या क्रेनचे काम चालु असतांना मयत पांडुरंग अमृतराव म्हस्के,वय ३५ वर्षे,रा.सर्व्हे नं.१८,अष्टविनायक नगर,आंबेगांव पठार,धनकवडी पुणे हा इलेक्ट्रीक पोलचे काम संपवुन साहित्य गोळा करीत असतांना क्रेनवरील चालक,त्याचा सहकारी व क्रेन मालक यांनी क्रेनच्या हुकला जोडलेली वायर चांगली आहे की नाही याबाबत काहीएक खातरजमा न करता वायर सुस्थितीत नसतांना त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन सदरची क्रेन कामासाठी वापरली, तसेच ठेकेदार,कॉन्ट्रॅक्टर यांनी सदर ठिकाणी काम करतांना सुरक्षिततेच्या दृष्ट्रीकोनातुन कोणतीही सुरक्षेची साधने न पुरविल्याने व क्रेनवरील चालक याने मयत पांडुरंग म्हस्के हा खाली काम करीत आहे हे माहिती असतांना देखील त्याकडे दुर्लक्ष करुन हयगयीने व निष्काळजीपणाने क्रेनचा हुक वर खेचल्याने तो तुटुन पांडुरंग म्हस्के याचे डोक्यात पडुन त्यास गंभीर दुखापत करुन त्याचे मरणास कारणीभुत झाले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.राहुल राजपुत,मो.नं.७०२०६७९२८४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे १४१/२०२४,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला वय २५ वर्ष रा.उरण जि.रायगड |
| **आरोपीत** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/०४/२०२४ रोजी दुपारी १३/३० ते १५/३० वा शिवनेरी बसने नेरुळ ते स्वारगेट असा प्रवास करत असतांना |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांची मैत्रिण असे शिवनेरी बसने नेरुळ ते स्वारगेट असा प्रवास करीत असताना नमुद तीन अनोळखी प्रवासी इसमांनी नेरुळ ते चांदणी चौक येथील कोथरुड कडे जाणा-या सेवा रस्त्यालगत कोथरुड ते स्वारगेट प्रवासा दरम्यान फिर्यादी यांचे बॅगेत ठेवलेले रोख ४,०००/- रुपये व सोन्याचे,हि-याचे दागीने असा एकुण २,९६,००/- रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा.इंगळे मो.नं.७७२००७४६६३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे २९/२०२४,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५१ वर्ष रा.उत्तमनगर पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक याने फोन करुन आमच्याकडे तुमच्या नावाचे कुरीयर मुंबइ एअरपोर्ट ला संशयास्पद मिळुन आले असुन त्यामध्ये ५ पासपोर्ट ४ क्रेडीट कार्ड १ लॅपटॉप २०० ग्रॅम एमडीएमए ४ किलो कपडे १ शुज हे सर्व तैवान येथील जॅंगलिन रा.११२/०३ सनबॉय रोड तायपाय सिटी तैवान यांना त्यांचे पत्यावरती पाठवण्यासाठी सांगीतले असुन मुंबई क्राईम ब्रॅंच चे कागदपत्रे पाठवुन त्यामध्ये मनीलॉंड्रींग व ड्रग्सचे गुन्हयात तसेच दाऊद सोबत संबंध असणारे मंत्री हे तुमच्या आधार कार्ड चा वापर करीत असुन त्यामध्ये तुमचा समावेश असल्याने गुन्हा दाखल आहे.अशी भिती दाखवुन सहकार्य करा नाहीतर तुम्हाला आणखी त्रास होणार आहे असे बोलुन आता तुमचे बॅंक खाते वर किती रक्कम आहे फिर्यादी यांनी सांगितले की ३,३०,०००/-रु आहे.तेव्हा त्यातील ९२ टक्के रक्कम आरबीआय चे खातेवर पाठवावे लागेल आरटिजीएस करा असे सांगुन फि यांना नमुद बॅंक खाते क्र वर ३,०५,६४९/- रु पाठवण्यास भाग पाडुन फि यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) जितेन्द्र कदम मो.नं.९१७२३३६२०३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**